# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २५/०९/२०२०

मा. स्थायी समिती सभा
सभा सूचना क्र. ०६

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती ....................................................**
**स्थायी समिती सदस्य/सदस्या,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. २९/०९/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०२० सभा सुचना क्र. ०६ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| ३५ | दि. १६/०३/२०२०, दि. २०/०३/२०२०, दि. ३०/०४/२०२०, दि. ११/०५/२०२० व दि. २२/०६/२०२०, दि. २६/०६/२०२० (दि. २२/०६/२०२० रोजीची तहकुब सभा), दि. ०९/०७/२०२० व दि. १७/०८/२०२० रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्य/प्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक** |
| --- | **विनंती अर्ज – निरंक** |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक** |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| ३६ | मिरा भाईदर महानगरपालिका समाजविकास विभागा अंतर्गत शिक्षण विभागात कार्यरत काळजीवाहक यांना मुदतवाढ देणेबाबत. |
| ३७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन काचऱ्याचे (Construction & demolation waste (C&D)) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामांच्या दरांना मान्यता देणेबाबत. |
| ३८ | मिरा भाईंदर महानगरपालिका Cloud Computing Policy- Empanelment of Cloud Service Providers and Guidelines for Government organization कामाबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १७/०८/२०२० रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३१) |
| ३९ | साकेत ते हटकेश पर्यंतची फिडरमेन जलवाहिनीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे कामाच्या निवीदेला मंजुरी मिळणेबाबत. |
| ४० | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर रस्ता UTWT पध्दतीने कॉक्रीटीकरण करणे कामाबाबत. |
| ४१ | निवीदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ४२ | मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या निवीदेचे अवलोकन करणे.<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेस विवीध प्रकारचे बोर्ड-बॅनर, नेमप्लेट व फलक इ. पुरवठा करणे. |
| ४३ | कोविड-19 कामी ई-लोकार्पण सोहळा कार्यक्रमासाठी (HD Camera, Photo, HD Video Mixer व इतर काम) करणेकामी दरपत्रकाचे अवलोकन करणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक** |

**दिनांक :- २५/०९/२०२०**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

अपंग कल्याण विभाग

सभा दि :- २५/ ९ /२०२०

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.३६:- मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागा अंतर्गत शिक्षण विभागात कार्यरत काळजीवाहक यांना मुदतवाढ देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेण्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत काळजीवाहक नेमण्यात आले होते. त्यातील ०६ काळजीवाहक मार्च २०१५ पर्यंत कार्यरत होते. परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि.०८/०४/२०१५ रोजीच्या झालेल्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये अशा स्पष्ट सुचना देण्यात आल्या की, कार्यरत काळजीवाहक यांच्या मानधनाची रक्कम शासनाकडुन सन २०१५-१६ साठी मंजुर केली नसल्याने काळजीवाहक यांना सुचित करुन कार्यमुक्त करावे. त्याअनुषंगाने शिक्षण विभाग कार्यालयात दि.१३/०४/२०१५ रोजी बैठक घेण्यात आली व काळजीवाहक यांना कार्यमुक्त करण्याच्या तोंडी सुचना देण्यात आल्या. मा. आयुक्त सो. यांचेकडुन कार्यरत खालील काळजीवाहकाचे मानधन हे अंध व अपंग कल्याण विभागाकडुन अदा करण्याचे तोंडी निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार खालील ०६ काळजीवाहकांना मा. महासभा दि.४/१२/२०१६ प्रकरण क्र.११६ ठराव क्र.८७ नुसार रु.४०००/- मानधनासाठी व त्यांना पुढील १ वर्षाची मुदतवाढ देण्यात आलेली होती.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक |
| २ | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक |
| ३ | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक |
| ४ | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक |
| ५ | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक |
| ६ | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक |

समाजविकास विभाग अंतर्गत शिक्षण विभागा अंतर्गत कार्यरत सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात काळजीवाहक यांना २ एिप्रल २०१९ ते ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तरी काळजीवाहकांना ०२ एप्रिल २०२० ते दि.२८ फेब्रुवारी २०२१ पर्यत मुदतवाढ देण्यास तसेच सदर काळजीवाहकांचे मानधन सन २०२० च्या अंध व अपंग कल्याण योजनेच्या लेखाशिर्षातुन अदा करण्याबाबतचा विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता मा. स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यास मंजुरीस्तव शिफारस आहे.

(संभाजी वाघमारे)

उप-आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.24/ 8 /2020

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक (360) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste ( C & D )) संकलन, वाहतुक, पुर्नचक्रीकरण करणे कामांच्या दरांना मान्यता देणेबाबत..

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम **2016** लागु झाले आहेत. या नियमांतर्गत बांधकाम व निष्कासनानुसार कचरा निर्माते कचऱ्याची साठवणुक त्यांच्या जागेत करतील व अधिकृत कचरा संकलन केंद्रावर किंवा प्रक्रीया केंद्रावर सशुल्क जमा करतील. सदर नियमाची अंमलबजावणी **5** ते **10** लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरांनी **24** महीन्यात करावयाची आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि.**03/11/2018** ठराव क्र.**99** अन्वये मिरा भाईंदर महानगपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम **2016** नुसार ठाणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीकडे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचरा देणेसाठी कार्यवाही करणेस तसेच बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम **2016** ची नागरीकांसाठी जाहीर सुचना प्रसिध्दी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. **7** मार्च **2019** रोजी पासुन वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देऊन बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम **2016** लागु केलेले आहेत. ठाणे महानगरपालिकेचे नेमलेल्या मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. हे कंत्राटदार ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या धोरणानुसार व दरानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत काम करण्यास तयार असल्याने त्यांच्या मंजुर दराचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे दर मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. मा. महासभेच्या मान्यतेनुसार ठाणे महानगरपालिकेने ठरविलेले खालील दर शुल्क वर्ग प्रकारानुसार मंजुर आहेत.

"अ" लघु कचरा निर्माते : एक मेट्रीक टनापेक्षा कमी कचऱ्याची निर्मिती.

**पर्याय** : 1. कचरा संकलन व वाहतुक करुन अधिकृत कचरा संकलन केंद्रावर जमा केल्यास शुल्क नाही.

2. कचरा निर्मात्याने कचरा निर्मितीच्या ठिकाणाहून अभियोक्त्याकडे कचरा उचलण्याकरीता मागणी केल्यास शुल्क रु.1089/-

**"ब" मोठे कचरा निर्माते** : एक टन व त्याहुन अधिक व 20 टनापर्यंत कचऱ्याची निर्मिती

**पर्याय** : 1. संकलन, वाहतुक प्रक्रिया करिता शुल्क रु.1089/- प्रती मे.टन.

2. प्रक्रिया केंद्रावर कचरा संकलन वाहतुक करुन प्रक्रियेसाठी जमा केल्यास शुल्क रु.545/- प्रती मे.टन

**"क" घाऊक कचरा निर्माते** : 20 टनाहून अधिक प्रती दिन अथवा 300 टन प्रती महिना / प्रती प्रकल्प कचरा निर्मात्याने कचरा व्यवस्थापन आराखडा विहित नमुन्यात मंजुरीकरिता सादर करणे बंधनकारक आहे, घनकचरा प्रकल्प खात्याने 30 दिवसात मंजुर करुन निर्धारित शुल्क भरणा केल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल. घाऊक कचरा निर्मात्याने कचऱ्याचे 4 प्रकारात वर्गीकरण करुन साठवणुक करणे बंधनकारक राहील. संबंधित घाऊक कचरा निर्मात्याने वर्गीकृत कचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतुक केल्यास फक्त प्रक्रिया शुल्क रु.545/- प्रती मे.टन आकारण्यात येईल.

**"ड"** ठाणे महापालिकेमार्फत बांधकाम निष्कासन, रस्ते, विकास, इमारत बांधकाम इत्यादी स्थापत्य कामातुन निर्माण होणारा बांधकाम व निष्कासन कचरा संकलन व वाहतुक केल्यानंतर प्रक्रिया करणेकरिता रु.525/- प्रती मे.टन शुल्क आकारण्यात येईल. अभियोक्तामार्फत संकलन, वाहतुक व प्रक्रियेकरिता रु.1050/- प्रती मे.टन शुक्ल आकारण्यात येईल.

**"इ"** रस्ते, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, दुरध्वनी इत्यादी भुमिगत सेवा पुरविण्याचे कामातुन निर्माण होणारा बांधकाम व निष्कासन कचरा संकलन व वाहतुक केल्यानंतर सदर कचऱ्याच्या प्रक्रियेसाठी रु.545/- प्रती टन शुल्क आकारण्यात येईल.

**"फ"** सार्वजनिक / ठिकाणी / रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला / सखल नदी / नाले / पाणथळ / तलाव / तिवरे / जंगल इत्यादी ठिकाणी अनधिकृतपणे व अनिर्बंधपणे टाकलेला बांधकाम व निष्कासन कचऱ्याने संकलन, वाहतुक व प्रक्रिया या करीता अभियोक्त्यास 75% शुल्क अदा करण्यात येईल. उर्वरित दंड रुपात वसुल (म्हणजेच रु.788/- प्रती मे टन) झालेली रक्कम 90 दिवसात अभियोक्तास देण्यात येईल.

**दंड** : बांधकाम व निष्कासन कचरा निर्माते, वाहतुक ठेकेदार, शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था इत्यादीनी बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 चे पालन / पुर्तता न करण्याबाबत दंड रु.5000/- ते रु.20000/- विविध बाबींकरिता वसुल करण्यात येईल.

तथापी मा. स्थायी समिती सभा दि. 28/08/2019 ठराव क्र.51 अन्वये ठाणे महानगरपालिकेने नेमलेल्या मे. मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. या कंत्राटदारास फक्त 6 महीन्याकरीता नेमावे व यापुढे बांधकाम व निष्कासन कचऱ्याची सदर कंत्राटरारामार्फत विल्हेवाट लावुन कचरा निर्माण करणाऱ्या मालकाकडुन सदर कंत्राटदाराने शुल्क आकारावे तसेच मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात सदर प्रकल्प उभारणेची कार्यवाही करावी व त्याचा सविस्तर आराखडा मा. महासभेपुढे ठेवावा असा निर्णय घेतला.

सदर प्रस्तावाबाबत मा.महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.82 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतले

1. सदर प्रकल्प मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर, बांधा, वापरा व हस्तांतर करा पध्दतीने राबविण्यासाठी जागा उपलब्ध करुन प्रक्रिया करण्यात यावी.
2. सदर पध्दतीस प्रतिसाद न मिळाल्यास महानगरपालिकेमार्फत प्रकल्प राबविण्यासाठी निविदा प्रक्रीया करावी., मा.आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या हितानुसार कार्यवाही करावी.
3. सदर कामाच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

वरील ठरावानुसार महानगरपालिकेमार्फत सल्लागार नेमुन सदर प्रकल्पाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. मिरा-भाईदर महानगरपालिकेकडे सदर प्रकल्प राबविण्यासाठी कुठेही 5 एकर क्षेत्राची जागा उपलब्ध नाही. तसेच सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस टीपिंग फी द्यावी लागणार आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात डायघर येथे मे. मेट्रो वेस्ट हॅण्डलिंग प्रा.लि.या एजन्सीचा प्रकल्प सुरु असून ठाणे महानगरपालिकेसोबत झालेल्या करारनाम्यानुसार डायघर प्रकल्पाच्या 30 कि.मीटर परिघात असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील समाविष्ट करण्याचे नमुद असल्याने व मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र डायघर पासून 30 कि.मीटर च्या आत असल्याने ठाणे महानगरपालिकेने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सदर एजन्सी सोबत करारनामा करणेस दि.11/09/2018 रोजी परवानगी दिलेली आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका मा.महासभा दि.03/11/2018 ठराव क्र.99 अन्वये ठाणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सी कडे मनपा क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचरा (C & D) देणेस मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार मे.मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा.लि. हि एजन्सी ला विचारणा केली असता त्यांनी महानगरपालिकेस पत्र देऊन करारनामा करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन इमारती, बांधकाम विविध विकासाची कामे, इमारती दुरुस्ती, अंतर्गत सजावटीची कामे या मधुन मोठ्या प्रमाणावर बांधकाम व निष्कासन कचरा निघत असल्याने व सदर कचऱ्यावर बांधकाम व निष्कासन कचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये प्रक्रिया करणे बंधनकारक असल्याने सदर कार्यवाही करणे क्रम प्राप्त आहे. सदर कचरा उचलण्यावर महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणावर खर्च येत असतो. ठाणे महानगरपालिकेने ठरविलेल्या उपरोक्त अहवालात नमुद प्रमाणे सदर खर्च संबंधितांनी महानगरपालिकेकडे जमा करावयाचा असून महानगरपालिकेमार्फत कंत्राटदार यांना अदा करावयाचा आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर कचरा प्रकल्प उभारणे व त्यांचे संकलन करणे महानगरपालिकेच्या हिताचे नाही. तसेच सदर प्रकल्पासाठी लागणारी 5 एकर जागा ही सी.आर.झेड विरहित व वन विभागाच्या बाहेरील परिक्षेत्रात तसेच सदर प्रकल्पाच्या ठिकाणी प्रक्रीया करताना मोठा आवाज होत असल्याने रहिवास क्षेत्रापासुन दुर अशी जागा देखिल उपलब्ध नाही.

सदर वस्तुस्थिती व महानगरपालिकेस आर्थिक भार पडणार नसल्याची वस्तुस्थिती पाहता ठाणे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दरानुसार कंत्राटदारासोबत करारनामा करणेसाठी मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**कार्यकारी अभियंता (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC/09/VP/2020-21/DK/SG-1 C & D

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि.२५/०९/२०२०.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्रं. ३९ :- साकेत ते हटकेश पर्यंतची फिडरमेन जलवाहिनीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे कामाच्या निविदेला मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात निविदा मागविण्यात आलेली असून त्याचा तपशील खालीप्रमाणे आहे.

सदर कामाची जाहिर निविदा सुचना क्र.०६/०२ दि.०४/०६/२०२० रोजीच्या लोकसत्ता, वृत्तरत्न सम्राट, महाराष्ट्र सम्राट, नवभारत, खबरे आजतक, मिड-डे व फ्रि प्रेस जनरल मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता दि.२९/०६/२०२० पर्यंत तीन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असुन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता दोन निविदाधारक पात्र ठरले आहेत व एका निविदाधारक अपात्र ठरले आहेत. सदर निविदेतील आर्थिक देकार लिफाफा उघण्यास दि.२१/०७/२०२० रोजी मा. निविदा निवड समितीने शिफारस केलेली आहे.

दि.२४/०९/२०२० रोजी मा. आयुक्त यांच्या समवेत झालेल्या अंतिम वाटाघाटीमध्ये मे. एस.बी.खकाळ यांनी निविदेमध्ये सादर केलेले दर कमी करुन सदरचे काम अंदाजपत्रक दरापेक्षा ५.००% कमी दराने करण्यास तयार असल्याचे पत्र दिलेले आहे. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे अंतिम दर प्राप्त झाले आहेत.

**साकेत ते हटकेश पर्यंतची फिडरमेन जलवाहिनीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे.**

(अंदाजित खर्च रु. १,१२,७५,७५५/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) मे. एस.बी. खकाळ | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.२५% जास्त दर<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा ५.००% कमी दर** |
| २) मे. एस.डी.बुटाला | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.९२% जास्त दर |

**उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. एस.बी. खकाळ यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ५.००% कमी दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.**

(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)

कार्यकारी अभियंता (पा.पु.)
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. 24/8/2020

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.:- ( ४० )** मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर रस्ता UTWT पध्दतीने कॉक्रीटीकरण करणे कामाबाबत.

घोडबंदर रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास मा. महासभा दि.28/06/2016 ठराव क्र.07 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त असुन सदर रस्त्याच्या प्रथम टप्प्यातील कामाची निविदा मागविण्यात आलेली आहे. सदर कामाच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा दि.04/12/2019 ठराव क्र.162 अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानूसार सदर कामाचे कार्यादेश हे मे. शायोना कार्पोरेशन यांना दि.05/03/2019 रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले आहे. सदर कामांची किंमत रु.24,87,80,243/- एवढी आहे. प्रत्यक्षात मंजूर रस्त्याची लांबी ही 2250 मीटर व रुंदी विकास योजने प्रमाणे 18 मीटर नुसार 405000 चौ.मी. क्षेत्रफळ आहे. तथापी प्रत्यक्षात जागेवर 9.00 मीटर रुंदीचा रस्ता असून उर्वरीत 9.00 मीटर रुंदीच्या जागेवर 1990 पुर्वीपासुन ची घरे आहेत. तर एका बाजूस वन विभागाची जागा आहे. सदर रस्ता विकास योजनेप्रमाणे 18 मीटर रुंदीचा करावयाचा झाल्यास 350 सदनिका पात्र लाभार्थ्यांना कायमस्वरुपी दयाव्या लागतील. महानगरपालिकेची सदर सदनिका उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदर रुंदीकरणाचे काम सदयस्थितीत करता येत नाही. सदर रस्त्यामधील मंजूरी नुसार उरणाऱ्या 20250 चौ.मी. क्षेत्रफळ कामाच्या अंदाजपत्रकातून घोडबंदर रस्त्याचा पुढील भाग सगणादेवी मंदीर पासून सदर कंत्राटदाराकडून मंजूर दराने करुन घेता येईल. सदर कामाच्या खर्चासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कर्ज मंजूर झालेले असून सदर निधितून काम करण्यात येत आहे. सदर कामाच्या खर्चास कोणतीही वाढ होणार नाही. तरी सदर प्रस्तावित बदलास मान्यता देण्यात शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**कार्यकारी अभियंता (साबां)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-7 /DK/20-21/ SG-1

# // गोषवारा //

## मा. स्थायी समिती सभा दि.२५/०८/२०२०.

**प्रकरण क्र.४१ :- मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे.**
**(भांडार विभाग)**

**विषय क्र. :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारचे बोर्ड-बॅनर, नेमप्लेट व फलक इ. पुरवठा करणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारचे बोर्ड-बॅनर, नेमप्लेट व फलक इ. पुरवठा करणेकामी मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व त्यापैकी कमी दर असलेल्या निविदेस मा. उप-आयुक्त (भांडार) यांनी दि. 23/03/2020 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारचे बोर्ड-बॅनर, नेमप्लेट व फलक इ. पुरवठा करणेकामी अंदाजित रु. 5,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

**उप-आयुक्त (भांडार)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका

जनसंपर्क विभाग

मा.स्थायी समिती सभा दि.२५/ ८ /2020

// गोषवारा //

प्रकरण क्र. (४३) कोविड-19 कामी ई-लोकार्पण सोहळा कार्यक्रमासाठी (HD Camera, Photo, HD Video Mixer व इतर काम) करणेकामी दरपत्रकाचे अवलोकन करणे.

मिरा भाईंदर क्षेत्रात कोविड-19 चा प्रादुर्भाव कमी करणे व उपाययोजना करणे कामी स्व. प्रमोद महाजन सभागृह व स्व. मिनाताई ठाकरे मंडई येथे 363 खाटांचे विलगीकरणे केंद्र उभारले आहे. सदर क्रैंद्राचे ई-लोकार्पण सोहळा दि. 03/08/2020 रोजी झालेला आहे. त्यासाठी जनसंपर्क विभागामार्फत व्हिडीओ कॉन्फरन्स व्यवस्था, फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(क) नुसार कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास त्या या अधिनियमान्वये दुसऱ्या एखाद्या नगरपालिका प्राधिकाऱ्याच्या किंवा [राज्य] शासनाच्य मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे अशी तरतूद आहे.

सदरचे काम तात्काळ करावे लागणार असल्याने सदर कामी होणाऱ्या आवश्यकतेनुसार खर्चास मा. आयुक्त साो. यांनी मान्यता दिलेली आहे. याकामी तीन दरपत्रके मागविणेत आलेली आहेत. प्राप्त दरपत्रक धारकांनी दरपत्रकात सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Particulars | Qty | Pradnya Photo Studio | Mira Bhayander Yuva Foundation | Dhruvi Digital Photo |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1 HD Video Mixer | 1 | 25,000/- | 28,084/- | 26,550/- |
| 2. | 3 Sony HD Video Camera | 3 | 12,000/- | 14,750/- | 13,570/- |
| 3. | 2 Video Highlights | 2 | 18,000/- | 20,296/- | 19,116/- |
| Total | | | 55,000/- | 63,130/- | 59,236/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता M/s. Pradnya Photo Studio यांनी दरपत्रकात सादर केलेले दर हे इतर दरपत्रक धारक M/s. Mira Bhayander Yuva Foundation व M/s. Dhruvi Digital Photo यांच्या तुलनेत कमी असल्याने करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेत आलेला आहे. सदर कामी रु. 55,000/- (सर्व करासह) खर्च झालेला आहे.

उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) नुसार अवलोकन करणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

(महेश वरुडकर)

अति. आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका